# पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी-411018

## विद्युत विभाग

## जाहीर प्रकटन-2021

**पावसाळ्यामध्ये विजेचा झटका लागु नये याकरीता नागरिकांनी दक्षता घेणेबाबत......**

नागरिकांच्या सार्वजनिक सुरक्षिततेकरीता महानगरपालिकेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती,सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर प्रकाश व्यवस्थेकरीता दिवाबत्तीची यंत्रणा उभारणेत आलेली आहे.सदर दिवाबत्ती प्रकाश व्यवस्थेची देखभाल दुरुस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार करण्यात येते.

तरी तमाम नागरिकांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविणेत येत आहे की,सदर इमारती व दिवाबत्तीचे खांबामधुन मनपाकडुन प्रकाशव्यवस्थेकरीता थ्री फेज 440 व्होल्टचा वीजपुरवठा केलेला असतो.तरी नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील बाबींचे कटाक्षाने पालन करावे.-

- नागरिकांनी पथदिवे खांब व विद्युत य़ंत्रणेशी कोणत्याही प्रकारची छेडछाड करु नये.
- खांबाला व फिडरपिलरला स्पर्श करु नये.
- पथदिवे खांबातुन विनापरवाना वीज घेऊ नये.
- जनावरे खांबांना बांधु नयेत.
- जंक्शन बॉक्सवर पाय ठेवुन खांबावर चढु नये.
- कपडे वाळत घालण्यासाठी खाबांना तारा बांधु नये.
- बांधकामामध्ये पथदिव्यांचे खांब घेऊ नये.खांबांना फ्लेक्स ,होर्डिंग्ज बांधु नये.
- कोणत्याही प्रकारची केबल/तार खांबावरुन ओढु नये.

वरील निर्देशित प्रकारच्या कृत्यामुळे संबंधित नागरिकांचे जिवितास धोका उत्पन्न होण्याची किंवा जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.अश्या प्रकारच्या कृत्यामुळे कोणत्याही प्रकारची जिवित अथवा वित्त हानी झाल्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका अश्या दुर्दैवी घटनेस जबाबदार रहाणार नाही याची सर्व संबंधित नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/
**श्री.संजय खाबडे**
सहशहर अभियंता (वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.

प्रत- 1) मा.आयुक्तसो. यांस माहितीस्तव सादर